**कौ.हिं.म.सं.अ.अ.नं. १३/२०२१**

**नि. क्र.**

**अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – इब्राहिम ईस्माईल मुल्ला,

**वय –** ६१ वर्षे, **व्यवसाय** – सेवा निवृत्त,

**राहणार** – कुरधुंडा, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

**अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती बी. एस. मुरुडकर यांचेकडून सरतपास सुरु –**

**०१**. मी प्रस्तुत अर्जदाराला ओळखतो. मी मुस्लीम जमातीचा सचिव म्हणुन काम पाहतो. आमच्या जमातीचे नाव – न्यु स्टार, जमातुल मुस्लीमीन कुरधुंडा, निचेका मुल्ला, असे आहे. अर्जदार माझ्याकडे लेखी अर्ज घेवुन दिनांक २२/०२/२०२१ रोजी आल्या होत्या. सदरचा अर्ज मी दाखल करुन घेतला. दाखल करुन घेतल्याची मी त्यावर सही केली. *(साक्षीदार निशाणी क्रमांक ११ कडील कागदपत्रांच्या यादीसोबतच्या दस्ताची पडताळीत प्रत दाखविण्यात आली). ती तीच आहे. त्यावर Received म्हणुन माझी सही आहे. माझ्या सही खाली मी तारीख २२/०२/२०२१ अशी नमुद केली आहे.* आमच्या जमातीचे अध्यक्ष – जमुरत अलीसाहेब अलजी हे आहेत. त्यांच्यासोबत माझी चर्चा झाली.

**०२**. अर्जदाराने सदरचा अर्ज आमच्या गावातील रहीवासी रफिक दाऊद अलजी यांची मुलगी – सुम्मैया हिच्याविरुध्द दाखल केला होता. आमच्या अध्यक्षांनी सुम्मैया हिचे वडील – रफिक यांना चर्चाकरीता बोलाविले होते. परंतु, ते चर्चेकरीता आले नाहीत. त्यापुढे आम्ही काहीही केले नाही.

**सरतपास पुर्ण**.

**<u>उलटतपास – गैरअर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडुन</u>** –

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, आमची वर नमुद जमातीची संस्था ही नोंदणीकृत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याचा सचिव म्हणुन काम पाहत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी सामील केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर लेखी अर्जावर माझ्या सहीखाली मी माझे नाव व पदनाम नमुद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जाबाबत मी जमातीच्या अध्यक्षांसोबत चर्चा केल्याचे दाखविणारा माझ्या शब्दाव्यतीरीक्त अन्य कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुम्मैया हिच्या वडीलांना जमातीच्या अध्यक्षांना चर्चेकरीता बोलाविलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर मी दाखल केला नाही.

**०४**. हे म्हणणे खरे आहे की, फरहा आंबेडकर हिने न्यायालयात दाखल केलेला अर्ज मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फरहा हिच्याशी माझी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सर्वच खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.04 18:15:55 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**
**जि. रत्नागिरी.**

**दिनांक ०३/१२/२०२५**
**स्थळः देवरुख**

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 03/12/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 03/12/2025 |
| evidence uploaded on | :- | 04/12/2025 |